# तीन ताकदवान स्त्रिया

## एक जपानी लोककथा



# तीन ताकदवान स्त्रिया

एक जपानी लोककथा

**मराठी : गार्गी लागू**



# तीन ताकदवान स्त्रिया



एक जपानी लोककथा



शेकडो वर्षापूर्वी जपानमधे एक प्रसिध्द पहेलवान रहात होता. एकदा जपानी सम्राटासमोर कुस्ती खेळण्यासाठी तो राजधानीकडे निघाला होता.

छेट्या झुडपांना तुडवत, लांब लांब टांगा टाकित तो सतत सात तास चालत होता. आणि असाच अजून सात तास न दमता चालूही शकत होता.

शरद ऋतु होता. आकाश समुद्राच्या पाण्यासारख निळ निळ होत. हवा उबदार होती. सूर्याच्या मंद प्रकाशात रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडं लाल, नारिंगी रंगाची दिसत होती.

पहेलवान मजेत गाणं गुणगुणत चालला होता. गाण्याच्या तालावर त्याची पाऊले पडत होती. त्याचे अंगावरचे पातळ करड्या रंगाचे कपडे वार्याने फडफडत होते. त्याच्याजवळ तलवार नव्हती. त्याला आत्मविश्वास होता की निर्जन, अंधार्या रस्त्यावरहि त्याला तलवार बाळगायची आवश्यकता नव्हती. गारठवून टाकणार्या थंडीत त्याच्यासारख्या अवाढव्य माणसासाठी महागडे गरम कपडे शिवणं कुणाही शिंप्याला शक्य नव्हते. तो एक सुध्द्रुढ, धट्टाकट्टा ताकदवान पहेलवान होता.....पण थोडा गर्विष्ठही होता.

झाडांच्यामागून येणार्या झुळझुळ वाहणार्या पाण्याच्या आवाजावरून त्याला समजलं की तो नदीच्या किनार्याने जात होता. तो मोठ्याने " जुन जुन " गाऊ लागला. त्याला त्याचा आवाज आवडत होता. त्याला पाण्याच्या आवाजापेक्षा उंच आवाजात गायच होत.

त्याच्या मनात आलं की " लोक मला " सदैव - पर्वत" या नावाने पुकारतात कारण मी खूप शक्तिशाली आहे, अवाढव्य, शूर आहे आणि विनम्र पण आहे कारण मी कधी आत्मस्तुती करीत नाही.





त्याने एका मुलीला पाहिले. ती नक्कीच नदीवरून येत असावी कारण ती तिच्या डोक्यावरील बादली संभाळत चालत होती.

बादली पकडलेले हात लहान होते. ती एक छान गोल मटोल लहान मुलगी होती. तिचे गाल लाल लाल होते. आणि नाक बटणासारखे बसके होते. तिच्या डोळ्यावरून वाटत होते की क्षणभरात ती हज्जार मजेदार गोष्टींचा विचार करीत असावी. खूप कष्टाने ती रस्त्यावर चढून आली आणि रुबाबात पहेलवानापुढे ठुमकत ठुमकत चालू लागली.





"या मुलीची मी गुदगुल्या करून खोडी काढली नाही तर जन्मभर ही गोष्ट मला डाचत राहिल," पहेलवान मनाशी म्हणाला. "ती नक्कीच चीं चीं करेल, आणि मला खूप हसू येईल. तिच्या डोक्यावरची बादली खाली पडली तर खूपच मजा येईल......पण मग मी धावत जाऊन बादली भरून आणिन आणि तिला घरी घेऊन जाईन."

त्याने दबल्या पावलांनी जाऊन हळूच तिच्या काखेत बोटाने स्पर्श केला आणि "कुचुकुचुकुचु" आवाज केला.

ती मुलगी जोराने हसली, ओरडली आणि तिने तिचा हात खाली आणला. आता पहेलवानाचा हात, तिचा हात व तिचे शरीर यामधे आला.

"हो हो.....तू मला पकडलेस..आता मी हलू शकत नाही," पहेलवान हसून म्हणाला.

त्याला वाटले की मुलगी खेळकर स्वभावाची आहे. मी केलेली खोडी तिला आवडली. त्याने आपला हात सोडविण्याचा प्रयत्न केला....पण तो हात सोडवू शकला नाही. त्याने परत प्रयत्न केला...जास्त ताकद लावून.....

"अग छोट्या मुली, मला जाऊ दे," तो म्हणाला.



"मी खूप ताकदवान आहे. मी जास्त जोर लावला तर तुला दुखापत होईल," तो म्हणाला.

"तर मग घे खेचून तुझा हात....मी ताकदवान लोकांचा आदर करते," मुलगी म्हणाली.

ती चालू लागली. पहेलवानाने इतक्या जोराने आपला हात खेचला की घर्षणाने जमिनीला पण तडे गेले. पण तो काही हात सोडवू शकला नाही. तो मुकाट्याने मुलीच्या मागे चालत राहिला. एखादं लहान मुल असत तरी या मुलीने त्याचा याहून कमी सन्मान केला नसता.

"कृपा करून मला जाऊ दे," त्याने विनवणी केली. "मी प्रसिध्द पहेलवान "सदैव-पर्वत“ आहे. मला सम्राटासमोर कुस्ती खेळायची आहे." लाजेने आणि शरमेने त्याच्या डोळ्यातून अश्रु आले......"आणि तू माझ्या हाताला इजा करते आहेस" .....

मुलीने आपल्या डोक्यावरची बादली मोकळ्या असलेल्या हाताने सावरली. म्हणाली, "अरे बिचारा सदैव पर्वत, दमला आहेस का? मी तुला उचलून घेऊन जाऊ का? मी पाण्याची बादली इथेच ठेवते. नंतर येऊन घेऊन जाईन."



"मला उचलून घेऊन जाण्याची आवश्यकता नाही. फक्त माझा हात सोड. मग मी विसरून जाईन की कधी आपली भेट झाली होती. तुला माझ्याकडून काय हवं आहे?" पहेलवान अजिजीने म्हणाला.

"मी तुला फक्त मदत करू इच्छिते," मुलगी म्हणाली. आता ती त्याला उंच पहाडी रस्त्यावरून खेचत घेऊन चालली होती. "मला माहित आहे तुझा सामना दुसर्या पहेलवानाबरोबर होईल तेव्हा इतर पहेलवानाप्रमाणे तुला कठीण जाणार नाही. तू जिंकशील किंवा हरशील पण वाईट रितीने जखमी नक्की होणार नाहीस....पण तुला कधी एखाद्या खूप शक्तिशाली पहेलवानाबरोबर सामना करावा लागेल याची भिती वाटत नाही?"



सदैव - पर्वतच्या तोंडावरचा रंगच उडून गेला. तो डगमगला. तो कल्पना करू लागला की जपानमधे सगळे त्याच्याकडे बघून हसत आहेत. आणि म्हणत आहेत, "हा कसला सदैव - पर्वत!”

"बघितलस, तू किती लवकर दमलास!" मी अजून हळूहळू चालते. तू माझ्या आईच्या घरी का येत नाहीस? आम्ही तुला ताकदवान बनवू. कुस्तीचे सामने राजधानीमधे ३ महिन्यानंतर सुरू होतील, मला माहित आहे. कारण माझ्या आजीनेही भाग घेण्याचा विचार केला होता. आत्ता तिथे जाऊन तू वाईट लोकांच्या संगतीत वेळ घालविशील आणि आहे ती ताकदही गमावून बसशील.“

"ठीक आहे...३ महिने..मी येतो" पेहेलवान म्हणाला. त्याला वाटत होते की अजून काही घालविण्यासारख त्याच्याजवळ काही उरलं नव्हत. आणि त्याला भितीही वाटत होती की नाही म्हटलं तर ही मुलगी रागावून कुठल्यातरी झाडावर आपल्याला फेकून देईल, जोपर्यंत तो आपला विचार बदलत नाही.

"उत्तम!" ती प्रसन्नतेने म्हणाली. "आपण पोहोचलोच आहोत“

तिने त्याचा हात सोडून दिला. हात लाल झाला होता. थोडा सुजलाहि होता. "जर तू आपले वचन मोडून पळायचा प्रयत्न केलास तर मी तुझा पाठलाग करून तुला परत घेऊन येईन."



लवकरच ते एका टेकडीवर पोहोचले. तिथे एक छोटे घर होते. त्याचे छत गवताने शाकारलेले होते.

"आजी घरातच आहे, पण ती म्हातारी आहे, कदाचित झोपली असेल." मुलीने आपले हात डोळ्यावर ठेऊन खुणेने सांगितले. "आणि आई गायीला शेतातून परत घेऊन येत असेल....अरे, आई इथेच आहे.“

तिने हात हलविला. आईने गायीला उचलून घेतले होते. गायीला जमिनीवर उभे करून तिनेही हात हलवून प्रतिसाद दिला.

ती हसली, आणि अगदी आपल्या मुलीसारखीच गवत तुडवित त्याच्याकडे आली. अरे हीची चाल तर अजून मजबूत वाटते आहे...पहेलवानाच्या मनात आले.

"क्षमा करा,"आईने आपल्या कपड्यावरचे गायीचे केस झटकत म्हटले. हे डोंगरांतील रस्ते खडकाळ आहेत. गायीच्या पायाला दुखापत होऊ शकते. "मारू-मे, हा उमदा तरूण कोण आहे, ज्याला तू बरोबर घेऊन आली आहेस?”

मुलीने सगळी हकिकत सांगितली व काळजीयुक्त स्वरात म्हणाली, "आपल्याजवळ फक्त ३ महिने आहेत"



"ठीक आहे. काही करण्यासाठी ३ महिने फार मोठा काळ  नाही पण कमीहि नाही की आपण काहीच करू शकणार नाही," आई विचार करून म्हणाली. "पण हा खूप अशक्त दिसतो आहे. याने चांगलं खायला पाहिजे. अंगात शक्ति आली की आजी त्याला मदत करेल."

"हे बरोबर आहे," मुलगी म्हणाली. तिने आजीला हाक मारली.....जोरात ओरडून..कारण आजीला कमी ऐकू येत होते.

"येतेय ग..." आतून कर्कश आवाज आला.आणि एक ठेंगणीशी बाई हातात काठी घेऊन लडखडत बाहेर आली. येतांना ओक झाडाच्या बुंध्याशी अडखळली.

"ओ, मला आता पहिल्यासारखे दिसत नाही. या महिन्याभरात ४वेळा या झाडाशी अडखळले." ती तक्रारीच्या सुरांत म्हणाली. आणि आपले बारिक हात झाडाला लपेटून ते उखडून टाकले.

"अरे आजी, झाड उखडायला तू मला सांगायला हवे होतेस." मारू-मे म्हणाली.





"हो ग बाई...मी माझ्या म्हतार्या पाठीला कुठे दुखापत करून घेतली नसेल म्हणजे झालं....."मग ती मोठ्याने म्हणाली," मुली, हे झाड दूर फेकून दे, पण कुणाला ठोकर लागणार नाही असे बघ. आणि कुणाच्या अंगावर पडणार नाही ही काळजी घे.”

"झाड हलविण्यासाठी तू आईला मदत कर" मारू-मेने पहेलवानाला सांगितले. मग विचार करून म्हणाली, "राहू दे, तू नुसते बघ.“

आई झाडाच्या जवळ गेली. तिने दोनही हाताने पकडून झाड उचलल आणि अत्यंत निष्काळजीपणाने, जशा सर्वसाधारणपणे बायका फेकतात, तसे दूर फेकून दिलं. हवेबरोबर झाड तरंगत दूर गेलं. जस जस ते दूर जात होत तस तस ते लहान दिसत होत. मग दूर पर्वताच्या कडेला जाऊन पडलं.



"किती निष्काळजीपणा! मला ते पर्वताच्या पलिकडे फेकायच होतं. आता ते रस्ता अडवेल कदाचित! आता मला उद्या लवकर उठून ते रस्त्यातून बाजूला करावे लागेल," आजी म्हणाली.

पेहेलवानाला तर काही ऐकूच येत नव्हते. त्याला चक्करच आली.

“अरे, याला बिछान्यावर झोपवायला हवे," मारू-मे म्हणाली.

"बिचारा,किती अशक्त आहे हा...मला वाटत की आपण याला मदत करायला हवी. चला, मी याला उचलून घेऊन जाते. हा तर खूपच हलका आहे," आजी म्हणाली. तिने त्याला आपल्या खांद्यावर उचलून घेतले आणि एका हातात काठी घेऊन ती डगमगत घरात गेली.

दुसर्या दिवसापासून त्या तिघीजणींनी सदैव- पर्वतला, त्यांच्या मनातल्या शक्तिशाली तरूणाप्रमाणे ताकदवान बनविण्यासाठी कामाला लागल्या. त्याला साधाच पण सत्वयुक्त आहार ती देत असे. भात शिजवतांना पाण्याचे प्रमाण ती कमी करत गेली. काही दिवसांनी तांदूळ इतके कडक राहिले की साधारण माणूस ते चावू शकला नसताच पण पचवू पण शकला नसता.

प्रत्येक दिवशी त्याला ५ लोकांच्या वाटचे काम करावे लागत होते आणि रोज संध्याकाळी आजीबरोबर कुस्ती खेळावी लागत असे. मारू-मे व तिच्या आईला वाटत होते की आजी वयाने मोठी व कमजोर झाली असल्यामुळे पेहेलवानाला दुखापत होणार नाही. आणि आजीसाठीही तिच्या संधीवातावर हा व्यायाम चांगला होता.





त्याला जाणवत नव्हते पण त्याची ताकद दिवसेदिवस वाढत होती. आजी अजूनही त्याला हवेत उडवून देत होती व सहजतेने खाली आल्यावर पकडत होती.

तो विसरून गेला की या टेकडीपलिकडे जपानमधे तो एक प्रसिध्द पहेलवान होता व लोक त्याला 'सदैव- पर्वत' नावाने ओळखत होते. त्याचे पाय लाठीसारखे होते ते आता खांबासारखे झाले. त्याचे मोठे मोठे हात दगडासारखे कठिण झाले. जेव्हा तो बोटे मोडित असे तेव्हा थंडगार रात्री झाड तुटल्यावर आवाज येतो तसा आवाज येत असे.

कधी-कधी तो जपानी पहेलवानासारखी कुस्ती खेळत असे. एक पाय हवेत फिरवून जमिनीवर आपटायचा, नंतर दुसरा...! तेव्हा आजूबाजूच्या गावातील लोक म्हणायचे की 'अवेळी ढग गडगडत आहेत'



आता तो आजीसारखी झाड सहजपणे उखडून टाकू शकत होता. आणि भिरकाऊ पण शकत होता पण फार दूर नाही. तिसर्या महिन्याच्या शेवटी एका संध्याकाळी कुस्ती खेळतांना त्याने आजीला अर्धे मिनिट जमिनीवर दाबून ठेवले.

"हा हा हा," आजी हसली आणि उठून बसली. तिच्या चेहेर्यावरची प्रत्येक सुरकुती हसत होती. ती म्हणाली, "माझा विश्वासच बसत नाही आहे!”

मारू-मेला खूप आनंद झाला. तिने त्याला मिठी मारली पण....त्याच्या बरगड्या तुटणार नाहित इतक्या हळू.....

"खूप छान! तू ताकदवान झाला आहेस!" आई म्हणाली. नेहमीप्रमाणे ती गायीला शेतातून उचलून घेऊन आली होती. तिने गायीला खाली ठेवले आणि त्याची पाठ थोपटली. आता तो सम्राटासमोर शक्तिप्रदर्शन करण्यासाठी तयार झाला आहेस. हे तिघींनाही पटले होते.

"उद्या तू जाशिल तेव्हा ही गाय बरोबर घेऊन जा," आई म्हणाली. "ही विकून त्या पैशातून तुझ्यासाठी एक सुंदर रेशमी पट्टा खरेदी कर. आणि सम्राटासमोर जाशिल तेव्हा आपली निषाणी म्हणून परिधान कर."



"तुमची एकुलती एक गाय घेऊन जायचा मी विचारही करू शकत नाही. आधीच तुमचे माझ्यावर खूप उपकार आहेत. शिवाय शेती कामासाठी तुम्हाला तिची आवश्यकता पण आहे. होना...?"

त्या तिघी जोराने हसल्या. मारू-मे खिदळू लागली. तिची आई हसून जमिनीवर लोळू लागली. आणि आजी इतक्या जोरात कर्कष्यपणे ओरडली की तिला श्वास लागला. तिला पाठीवर थोपटाव लागलं.

'अरे देवा,' आई हसत म्हणाली, "आम्ही गायीकडून अस काम करून घेतोअसे तर समजत नाही आहेस ना? अरे, आजी एकटी ५ गायीपेक्षा जास्त ताकदवान आहे.“

"ही गाय आम्ही पाळली आहे," मारू-मे दात दाखवून बोलली. "तिचे भुरे डोळे खूप आवडतात."

"पण तिला रोज शेतात उचलून घेऊन जाणं आणि परत आणण हे खूप कंटाळवाण काम आहे," आई म्हणाली. "मग सम्राटाकडून जे मानधन मिळेल ते मी तुम्हाला देईन, ही तरी मला अनुमती द्या," सदैव-पर्वत म्हणाला.

"अरे नाही, असा विचारही आमच्या मनांत येऊ शकणार नाही," मेरू-मे म्हणाली. "आम्हाला तू इतका आपला वाटतोस, तुला काही विकत देऊच शकत नाही."



"खरे आहे!" सदैव-पर्वत म्हणाला. "तुझ्याशी विवाहबध्द होण्यासाठी मी तुझ्या आई व आजीची अनुमती मागतो. मला तुमच्या कुटूंबाचा हिस्सा व्हायला आवडेल."

आजीने व आईने यावर गंभिरपणे विचार केल्याचे नाटक  केले आणि मग मान डोलावली.

दुसर्या दिवशी सकाळी सदैव-पर्वतने जपानी पहेलवानाप्रमाणे आपल्या केसांची डोक्यावर गांठ बांधली. व तो निघण्यासाठी तयार झाला. त्याने मारू-मे व तिच्या आईचे आभार मानले व आजीला नमस्कार केला. कारण ती वयाने मोठी होती आणि कुस्तीमधे त्याची सहखेळाडू होती.

मग त्याने गायीला हावर उचलून घेतले व तो पर्वत चढू लागला. जेव्हा तो कड्यावर पोहोचला तेव्हा त्याने गायीला खांद्यावर घेतले व हात हलवून मारू-मेचा निरोप घेतला.





प्रथम ज्या गावात तो पोहोचला तिथे त्याने गाय विकली. त्याला चांगले पैसे मिळाले. त्यातून त्याने रेशमी पट्टा खरेदी केला.

जेव्हा तो राजमहालात पोहोचला तेव्हा त्याच्या लक्षात आले कि बरेच पहेलवान आधीच पोहोचले आहेत. ते सर्व मैदानात बसून कटोर्यातून भात खात होते. आणि बढाया मारित होते. त्यांनी सदैव-पर्वतकडे लक्ष दिले नाही. फक्त त्यांना वाटले की हा इतक्या उशिरा का आला? काही पहेलवानांना वाटल की तो आता शांत झाला आहे....बढाया मारित नाही आहे.....



राज दरबारातील सर्व स्त्री- पुरुष कुस्ती पहाण्यासाठी महालातील एका विशेष मंडपात बसले होते. त्यानी एकाहून एक सुंदर असे सोन्याने मढविलेले पोषाख परिधान केले होते. त्यांच्या चेहेर्यावर थंडीमधेही घामाचे थेंब जमा झाले होते. राज घराण्यातील पुरूषांजवळ रत्नजडित तलवारी होत्या. रत्नामुळे तलवारीचे वजन इतके वाढले होते की तलवारीचा उपयोग, त्यांना करायचा असला तरी ते करू शकणार नव्हते. राज स्त्रियांचे काळे लांब केस पसरलेले होते. त्यांनी चेहेर्यावर पांढरा लेप लावला होता. त्या भयावह दिसत होत्या.



एका पडद्याच्या मागे सम्राट बसले होते. लोक त्यांना पाहू शकत नव्हते. ते एक थकलेले पण दयाळू वृध्द होते. हा कुस्तीचा मुकाबला लवकर संपू दे म्हणजे ते आपल्या कक्षात जाऊन कविता लेखन करू शकतील.



ज्या दोन पेहेलवानांना कुस्तीसाठी निवडले गेले होते त्यापैंकि एक होता सदैव-पर्वत, आणि दुसरा ....ज्याचे पोट पूर्ण देशात मोठे होते. त्या दोघांनी आखाड्यात व अंगावर मिठ शिंपडले. यामुळे वाईट आत्मे दूर पळून जातात असा समज आहे.

मग दुसर्या पहेलवानाने आपले पोट बाजूला सारून पाय उचलला आणि जमिनीवर आदळला. जोराने आवाज झाला. त्याने रागाने सदैव-पर्वतकडे पाहिले. जणू काही ते त्याला आव्हान करीत होता, "ए गरीब बिचार्या, आता तू पाय आपटवून दाखव...."

सदैव- पर्वतने आपला एक पाय उचलला आणि जमिनीवर आदळला.

एक मोठा आवाज झाला जणू विजेचा कडकडाट! दूसरा पहेलवान साबणाच्या बुडबुड्यासारखा आखाड्यातून बाहेर फेकला गेला.





तो गुमान सम्राटाच्या पडद्यापुढे झुकला व म्हणाला, "पृथ्वी देवतेचा कोप झाला आहे. कदाचित मिठामधे काहीतरी गडबड आहे म्हणून यावर्षी मी स्पर्धेत भाग घेऊ शकत नाही." इतके बोलून तो निघून गेला. जाता जाता तो सदैव-पर्वतकडे संशयाने बघत होता.

त्याक्षणी इतर ५ जणांनी स्पर्धेत भाग न घेण्याचा  निर्णय घेतला. ते सर्व सदैव-पर्वतवर नाराज दिसत होते.

त्यानंतर सदैव-पर्वत जमिनीवर पाय आपटून जो कोणी कुस्ती खेळण्यासाठी येत होता त्याला उचलून सम्राटाच्या पडद्यासमोर फेकून सम्राटाला अभिवादन करीत होता.







राज स्त्रियांच्या भुवया अधिकच उंचावल्या. पहेलवान एकदुसर्याला मारत आहेत, खेचत आहेत हे बघायला त्या आल्या होत्या. पण सदैव-पर्वत अगदी सहजतेने जिंकत गेला. फक्त पडद्यापलिकडे बसलेले सम्राट आनंदी होते. कारण स्पर्धा लवकर संपणार होती आणि त्यांना कविता लिहिण्यासाठी वेळ मिळणार होता.



त्यांनी घोषित केले की पुरस्काराची सर्व रक्कम सदैव- पर्वत याला दिली जाईल.

पण ते म्हणाले की यापुढे तू कुस्ती स्पर्धा खेळणार नाहीस, असे वचन द्यायला हवेस, त्यांनी पडद्यातून रडत, निराश झालेल्या पहेलवानाकडे बघून सांगितले.



सदैव-पर्वतने वचन दिले की तो यापुढे कुस्ती खेळणार नाही. सर्वांनी मोकळा श्वास घेतला. खाली बसलेल्या पेहेलवानांच्या चेहर्यावर हास्य दिसले.

"मी विचार करीत आहे की मी शेती करेन," सदैव-पर्वत म्हणाला. व मारू-मे कडे जाण्यासाठी लगेच निघाला.

मारू-मे त्याची वाटच पहात होती. त्याला येतांना जेव्हा तिने पाहिले तेव्हा ती धावत त्याच्या जवळ आली. पुरस्काराच्या थैलीसकट मारू-मेने त्याला उचलून घेतले. पर्वताच्या अर्ध्या रस्त्यापर्यंत ती त्याला उचलून घेऊन आली. नंतर हसून तिने त्याला खाली उतरविले. उरलेला रस्ताभर तिने स्वत:ला सदैव- पर्वतला उचलू दिले.

सदैव-पर्वतने सम्राटाला दिलेले वचन पाळले. कुस्ती- स्पर्धा नाही खेळला. राजधानीमधे लवकरच त्याला सर्व विसरूनही गेले. पण वर पर्वतावर कधी कधी भूकंप होतो, मोठा आवाज, होतो तेव्हा तेथिल लोक अजूनही म्हणतात की मारू-मेची आजी कुस्ती खेळत आहे.

**समाप्त**

